शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी-वर्धा

## राष्ट्रीय सेवा योजना पथक

## नियमित उपक्रम अहवाल २०२०-२०२१

सत्र २०२०-२०२१ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित उपक्रमांना जून २०२० पासून प्रारंभ झाला. नियमित उपक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दीष्ट्ये, स्वयंसेवकाची कर्तव्ये, स्वयंसेवकाची आचारसंहिता, स्वयंसेवकाची सामाजिक बांधिलकी इत्यादींबाबत त्यांच्यात जागृती निर्माण करून युवक युवतींना राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी केले जाते.

**आंतरराष्ट्रीय योग दिवसः**

महाविद्यालयात २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून रासेयो पथक व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाद्वारा ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. सुशील चव्हाण यांनी प्राणायाम व विविध आसन प्रात्यक्षिकाद्वारे करून दाखविले व त्याचबरोबर आसनांची शास्त्रोक्त माहिती दिली. तसेच आसन व प्राणायाम यांचे महत्त्व सांगून यामध्ये नियमितता असल्यास चांगल्या प्रकारे लाभ मिळतो. म्हणून विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपले आरोग्य उत्तम ठेवण्याकरिता आसन व प्राणायाम नियमितपणे करण्यास भर द्यावा असे आवाहन केले. प्रा. डॉ. पुरूषोत्तम कालभूत यांनी योगासन व आरोग्य यांचा मेळ राखून आपण आपले जीवन आनंदी ठेवावे असे सांगितले. या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले.

**राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती :**

दि. ०२ ऑक्टोबर २०२० रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व जागतिक अहिंसा दिन साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून मौजा पानवाडी, ता.आर्वी, जि. वर्धा येथे वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी श्री पुरुषोत्तम भुतडा सरपंच, मा. श्री. भरतभाऊ भुतडा, अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती, मा. श्री. नौशाद अली, पोलीस पाटील, श्री. दीपक लाहोटी तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे, डॉ. राजकुमार मून, डॉ. सुशिल चौहान, प्रा. राजेंद्र वरकल व विद्यार्थी उपस्थित होते.

**दक्षता जनजागृती सप्ताह :**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २७ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर २०२० दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. प्रत्येक नागरिकाने सदैव सचोटी एकात्मता या तत्त्वांच्या पूर्ततेसाठी सतर्क व कटिबद्ध राहण्याची दक्षता घ्यायला हवी तसेच भ्रष्टाचाराविरुद्ध लढ्यात सहकार्य केले पाहिजे याकरिता 'दक्षता शपथ' घेण्यात आली. या कार्यक्रमात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले.

**राष्ट्रीय एकता दिनः**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक ३१ ऑक्टोबर २०२० रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्य 'राष्ट्रीय एकता दिन' साजरा करण्यात आला. राष्ट्राची एकता, अखंडता व सुरक्षितता अखंड राहावी याकरिता 'राष्ट्रीय एकता शपथ' घेण्यात आली. या कार्यक्रमात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले.

**राष्ट्रीय युवा दिन :**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १२ जानेवारी २०२१ रोजी स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्य 'राष्ट्रीय युवा दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत, उपप्राचार्य प्राध्यापक सुरेश पवार रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे, प्रा. प्रवीण बैस व डॉ. सुमेध धनविज यांची उपस्थिती होती

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. राजेश देशपांडे म्हणाले "स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविणाऱ्या राजमाता जिजाऊ व तल्लख बुद्धिमत्ता असलेले भारतीय संस्कृतीचे अभ्यासक तसेच तरुण वर्गाचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांनी आपल्या अतुल्य कर्तुत्वाने समाजापुढे एक आदर्श घडवलेला आहे. अशा महान व्यक्तींच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यायला हवी. आवश्यकता असेल तेव्हा समाजासाठी, देशासाठी बलिदान देण्यासाठी तत्पर असावे. सत्य, स्वाभिमान व समर्पण याद्वारे विवेकानंदांनी तरूण वर्गापुढे एक आदर्श उभा केलेला आहे. तरुणांनी यातून प्रेरणा घेऊन नवा इतिहास घडवायला हवा."

प्रा. प्रवीण बैस आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, "स्वामी विवेकानंदांवर अगदी बालपणापासून झालेल्या संस्कारांचा प्रभाव त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर आढळतो. नरेंद्र दत्त ते विवेकानंद हा त्यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनाही बालपणापासून जिजाऊंनी जे संस्कार दिले त्यामुळेच स्वराज्याची स्थापना होऊ शकली. या महान कार्यात शहाजी राजांचे योगदान विसरता येण्यासारखे नाही."

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम कालभूत याप्रसंगी मार्गदर्शन करताना म्हणाले की, ''राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद हे भारत देशाच्या भूमीत जन्मले याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. राजमाता जिजाऊंच्या संस्कारांमुळे शिवाजी महाराजांसारखे छत्रपती घडले तर विवेकानंदांच्या तत्वनिष्ठ विचारांमुळे भारताचा बलशाली तरुणवर्ग घडताना दिसतो आहे. विवेकानंद हे संन्यासी योद्धा होते. त्यांनी स्वतःच्या भौतिक सुखाची अपेक्षा न ठेवता स्वतःसाठी वैराग्य मागितले. त्यांनी तरुणांना निर्भय व शूर बनण्याची प्रेरणा दिली. स्वामी विवेकानंदांनी सांगितलेल्या मार्गावर आजचा युवावर्ग चालत असेल तर आपल्या देशाचे भवितव्य निश्चितपणे उज्ज्वल असणार आहे''

राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात कु. मोहिनी बोटकुले, कु. श्रेया दाते, कु. चैताली गजभिये व शुभम दुबे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. निकिता कंगाले हिने तर आभार प्रदर्शन कु. सलोनी शंभरकर हिने केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**आजादी का अमृत महोत्सव सहभाग :**

भारत सरकार, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व रासेयो विभाग मंत्रालय कक्ष महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग मुंबई यांच्या निर्देशानुसार भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण झाल्याप्रीत्यर्थ 'आजादी का अमृत महोत्सव' हा उपक्रम साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत दि. १२ मार्च २०२१ रोजी म. गांधी पुतळा, वर्धा ते सेवाग्राम आश्रमापर्यंत सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या सायकल रॅलीत महाविद्यालयातर्फे साहील कोडापे, बी. ए. (आर. एस.) भाग -३, श्रीपाल मारवाडे, बी. ए. (आर. एस.) भाग -३, वैभव हेंबाडे बी. ए. (आर. एस.) भाग -२, व अश्विन अंबुरे, बी. ए. (आर. एस.) भाग -१ हे रा.से.यो. स्वयंसेवक तसेच रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे, व प्रा. मिलींद माने सहभागी झाले होते.

**सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार :**

रा. तु. म. नागपूर विद्यापीठाद्वारा प्रदान करण्यात येणाऱ्या सत्र २०१९–२०२० चा सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्काराकरिता महाविद्यालयातील निलेश बोबडे, बी. ए. (आर. एस.) भाग -२ ह्या रा.से.यो. स्वयंसेवकाची निवड करण्यात आली.

**प्रा. मिलिंद माने   डॉ. राजेश देशपांडे**
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी

**डॉ. पुरूषोत्तम कालभूत**
प्राचार्य,
श्रीकृष्णदास जाजू
ग्रामीण सेवा महाविद्यालय
पिपरी, (वर्धा)